तरुण भारत संवाद
गुरुवार २२ फेब्रुवारी २०२४

# खडतर परिस्थितीतही गौतमचे तलाठी परीक्षेत यश

- वडिलांचा पंक्चर काढण्याच्या व्यवसाय
- कोणताही क्लास न लावता स्वयंअध्यनावर यश

वार्ताहर
आवळी बुद्रुक

वडिलांच्या पंक्चर काढण्याच्या छोट्याशा व्यवसायावरच घरचा चरितार्थ. आई घरकाम करत असते. घरी कुणीही नोकरीला नाही आणि शेतीही नाही अशा खडतर परिस्थितीवर मात करत आवळी बुद्रुक (ता. राधानगरी) येथील गौतम दत्तात्रय सुतार या युवकाने नुकत्याच सिंधुदुर्ग येथे झालेल्या तलाठी परीक्षेत उज्वल यश मिळवले. केवळ जिद्द आणि चिकाटी उराशी बाळगून स्वयं अध्ययनाच्या जोरावर हे यश मिळवले असल्याचे गौतमने सांगितले.



घरची परिस्थिती अत्यंत गरीब असलेल्या गौतमचे पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण गावीच झाले. आठवी ते दहावीपर्यंत आणाजे येथे तर पुढील अकरावी, बारावीपर्यंतचे शिक्षण समाज कल्याणच्या वस्तीगृहामध्ये राहत विवेकानंद महाविद्यालयात पूर्ण केले. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठमधून राज्यशास्त्र विषयातून पदवी शिक्षण घरातूनच पूर्ण केले. खाजगी नोकरीसाठी डोनेशन भरावे लागते तसेच सहकारी नोकरीसाठी पुढाऱ्यांच्या पाठीमागून फिरावे लागते हे धोके ओळखून कोणताही क्लास न लावता गावात शाहू वाचनालयात चिकाटीने अभ्यास करून गौतमने हे यश मिळविले. या यशाकामी त्याला आई, वडील व शिक्षक यांचे मार्गदर्शन व प्रोत्साहन लाभले. गौतमचे गावासह परिसरात कौतुक होत आहे. या यशाबद्दल सर्व ग्रामस्थांच्या वतीने गौतमचा सत्कार करण्यात आला.